पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर
पोलीस आयुक्त कार्यालय, २, साधु वासवाणी पथ, पुणे- ४११००१
फोन नं.०२०-२६२०८२८६/२६२०८२०२/२६१२३६६७
Email – sbpisecurity-pune@nic.in

जा.क्र.पोउआ/विशा/सुरक्षा/संरक्षण/८०९४/२०२३ पुणे,दिनांक :- ३०/०७/२०२३

विषय :- **मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे पुणे दौ-या दरम्यान सुरक्षिततेच्या अनुषंगाने पुणे शहर परिसरात ड्रोन वापर न करण्याबाबत**
**फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधक आदेश**

**आदेश**

ज्याअर्थी, पुणे शहरात दिनांक ०१/०८/२०२३ मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचा पुणे दौरा होणार असून सदर दौ-याचे अनुषंगाने माननिय यांचे जिवीतास कोणत्या ही प्रकारचा धोका उदभवू नये तसेच त्यांचे दौ-याचे दरम्यान कार्यक्रमाचे ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. तसेच माननिय यांचे दौ-याचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये तसेच दौ-याचे अनुषंगाने काही असामाजीक तत्वाकडून तसेच अन्य व्यक्तींकडून ड्रोनचा वापर करुन घातपाताची शक्यता नाकरता येत नाही. याकरीता पुणे शहर आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये दिनांक ३०/०७/२०२३ रोजी पासून पुढील दिनांक ०२/०८/२०२३ रोजी पर्यंत कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात ड्रोन न वापरणेबाबत ड्रोन चालक/मालक /आयोजक/नागरीक यांना सत्यता पटवून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेता येईल अशी परिस्थिती निमार्णन झाली आहे. त्या बाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी **आर. राजा, पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर** मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात खबरदारीचे उपाय म्हणुन **दिनांक ३०/०७/२०२३** रोजी पासून पुढील **दिनांक ०२/०८/२०२३** रोजी पर्यत **मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार** यांचा पुणे दौरा दरम्यान सुरक्षतेच्या अनुषंगाने ड्रोन चा वापर व उड्डान करण्यास मनाई आदेश देत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

**सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक :- ३०/०७/२०२३ रोजी दिला आहे.**

( आर.राजा )
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ३०/०७/२०२३